नाशिक
दि. ०९/०९/२०२१

# प्रेसनोट

**आलोसे जयवंत केदु कांबळे, तलाठी, सजा ओतुर, तहसिल कार्यालय कळवण, ता.कळवण, जि.नाशिक यांना २५,०००/— रूपये लाचेची मागणी केल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | कळवण तालुका पो.स्टे, जि.नाशिक, गुरनं. ३७१/२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कायदा कलम ७ प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | जयवंत केदु कांबळे, तलाठी, सजा ओतुर, तहसिल कार्यालय कळवण, ता.कळवण, जि.नाशिक |
| मागणी कलेली लाचेची रक्कम | २५,०००/— रुपये (तडजोडीअंती) |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ००/-- रूपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी मौजे कुंडाणे, ओतुर शिवारातील गट नंबर ८२ चेक्षेत्र ९२ आर ही शेतजमिन विकत घेवून खेरेदी केली असुन सदर शेतजमिनीचे ७/१२ उताऱ्यावर नांव लावुन नोंद टाकणे तसेच मंडळ अधिकारी यांचेकडून सदरची नोंद प्रमाणित करुन घेण्याचे मोबदल्यात तक्रारदार यांचेकडून आलोसे जयवंत केदु कांबळे, तलाठी, सजा ओतुर, तहसिल कार्यालय कळवण, ता.कळवण, जि.नाशिक यांनी ३०,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने दि.१८/८/२०२१ रोजी रोजी सापळापुर्व पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान आलोसे जयवंत केदु कांबळे, तलाठी, सजा ओतुर, तहसिल कार्यालय कळवण, ता.कळवण, जि.नाशिक यांनी तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदार यांचेसमक्ष ३०,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती २५,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेंविरुध्द कळवण तालुका पो.स्टे, जि.नाशिक, गुरनं. ३७१/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे दि.०९/०९/२०२१ रोजी गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक कार्यालयात संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक कार्यालय

संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in

ई—मेल : spacbnasik@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३—२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

( सतिश भामरे )
वाचक पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक